सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ या पदांवर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणुन बी.ए.एम.एस (B.A.M.S) अर्हताधारकांना नियुक्ती देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/भाग-२/सेवा-३
गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत
१० वा मजला, ए विंग, मुंबई-०१
तारीख: ०४ जुलै, २०१९

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः-मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३, दि.०२.०३.२०१५ व दि.२१.०४.२०१५
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१)/सेवा-३, दि.०३.१२.२०१८
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्रमांकः-मवैअ-२०१७/प्र.क्र.१८१/१७/सेवा-३, दि.०४.०५.२०१७

प्रस्तावना :-

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ रिक्त पदांवर कंत्राटी पद्धतीने वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने निव्वळ M.B.B.S. अर्हताधारक व त्यातील पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने तसा शासन निर्णय दि.०२.०३.२०१५ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दि.०३.१२.२०१८ अन्वये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कंत्राटी पद्धतीने नेमणुका करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन समितीस प्रदान करण्यात आले आहेत.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांच्या रिक्त पदी दि.०२.०३.२०१५ च्या शासन निर्णयानुसार निव्वळ M.B.B.S अर्हताधारक व त्यातील पदवीव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारकांमधुन रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरावयाची आहेत. तथापि, प्रयत्न करुनही रिक्त पदी M.B.B.S अर्हताधारक उमेदवार मिळत नाहीत अशा ठिकाणी सदर रिक्त जागा एम.बी.बी.एस.(M.B.B.S) अर्हताधारक कंत्राटी वैद्यकीय अधिकारी किंवा नियमीत वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत बी.ए.एम.एस. (B.A.M.S) अर्हताधारकांमधुन कंत्राटी पद्धतीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

१. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्रात )महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पद्धतीने एम.बी.बी.एस.(M.B.B.S) अर्हताधारकांमधुन प्राधान्याने भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे, B.A.M.S. अर्हताधाराकांमधुन त्या ठिकाणी नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. (M.B.B.S) अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे आगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने भरण्यात यावीत. सदर पदे वाचा येथिल क्र.२ नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती मार्फत भरण्यात यावीत.

२. उपरोक्त नमूद कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी आदिवासी व दुर्गम भागात काम करण्यास इच्छुक बी.ए.एम.एस. (B.A.M.S.) अर्हताधारकांना दरमहा रु.४५,०००/- व इतर भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. (B.A.M.S.) अर्हताधारकांना रु.४०,०००/- इतके एकत्रित मानधन देण्यात यावे.

३. सदर मानधनासाठी येणारा खर्च २२१० ०१४६ (१०) कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातुन भगविण्यात यावा.

४. उपरोक्त कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दि.०२.०३.२०१५ व २१.०४.२०१५ मधील नमूद अटी व शर्ती लागु राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२७१४३०५८९२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

व.मुं.भरोसे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग
२. विभागीय आयुक्त (महसुल) सर्व
३. आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई.
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)